# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## जेव्हा नारी-शक्तीने सांभाळले सिताबर्डी इंटरचेंज.....



नागपूर: त्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः हा एक प्रसिद्ध श्लोक आहे, ज्याचा अर्थ 'स्त्रियांचा सन्मान केला जातो तेथे देवत्व फुलते'. हा श्लोकाचे महत्व तेव्हा वाढते जेव्हा महा मेट्रोची नारी शक्ती एका स्थानकाचे नेतृत्व करते आणि ते सांभाळते. होय. सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशनला महा मेट्रोच्या नारी शक्तीने सांभाळले. या ठिकाणी बहुतांश कर्मचारी महिला होत्या. महा मेट्रोच्या

३७ मेट्रो स्टेशनमध्ये सर्वात जास्ती रहदारीचे असलेले सिताबर्डी इंटरचेंज. सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशन हे एका मार्गिकेवरून दुसऱ्या मार्गिकेवर जाण्याकरता महत्वाचे स्टेशन आहे.

सदर स्टेशन हे व्यावसायिक दृष्टिकोनातून रहदारीचे मेट्रो स्टेशन असुन 27 महिलांच्या एका मजबूत टीमने मेट्रो स्थानकांचे सर्व पैलू हाताळले ज्यात स्टेशन व्यवस्थापक, ट्रेन ऑपरेटर, सुरक्षा, तिकीट वितरक, कस्टमर केअर, हाउसकीपिंग इत्यादींचा समावेश आहे. सिताबर्डी इंटरचेंज ऑरेंज आणि एक्वा लाइन्सच्या मध्यभागी स्थित आहे.

महत्ववपूर्ण आहे कि ,सकाळी 5.30 ते रात्री 11.00 वाजेपर्यंत संपूर्ण महसुलाच्या वेळेत सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशनवर सर्व महिला कर्मचारी तैनात करण्याचा प्रयत्न गेल्या काही काळापासून सुरू होता. महा मेट्रोचे प्रयत्न या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या थीम शी सुसंगत होते यामध्ये "महिलांना वाव देत निश्चतच समाजाची प्रगती होईल. महा मेट्रोच्या वतीने मेट्रो भवन येथे महिला दिना निमित्य आयोजित कार्यक्रमात या महिलांचा सन्मान करण्यात आला.

महा मेट्रोचे सर्वात महत्वपूर्ण आणि उच्च असलेले मेट्रो स्टेशन महिलांनी सहजतेने हाताळले त्यांच्या या विलक्षण योगदान दिल्याबद्दल नारी शक्तीचा अभिमान आहे. या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'महा-मेट्रोचा चेहरा' असलेल्या या सर्व अद्भुत महिलांचा आपण सर्वांनी आदर, आदर आणि आदर करू या.